# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

## Agromet Advisory Bulletin

**Date : 30-04-2021**

**Weather Forecast of BHIVAPUR Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-04-30(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-05-01 | 0.0 | 42.3 | 26.0 | 30 | 12 | 12.0 | 180 | 2 |
| 2021-05-02 | 0.6 | 41.7 | 23.5 | 31 | 11 | 12.0 | 261 | 5 |
| 2021-05-03 | 0.0 | 38.6 | 23.0 | 32 | 16 | 14.0 | 248 | 5 |
| 2021-05-04 | 0.0 | 37.3 | 22.8 | 34 | 15 | 13.0 | 252 | 4 |
| 2021-05-05 | 1.8 | 37.7 | 23.3 | 45 | 22 | 11.0 | 204 | 4 |

### Weather Summary/Alert:

In Bhivapur block, as per forecast given by, IMD, RMC, Nagpur, sky will be partly cloudy to partially cloudy during next five days (01st May, 2021 to 05th, May, 2021) as well as light to moderate rainfall at isolated places and thunderstorm accompanied with lightning very likely to occur at isolated places and on 02nd, 03rd, 04th and 05th May, 2021 light to moderate rainfall at few places and thunderstorm accompanied with lightning very likely to occur at isolated places is forecasted.

भिवापुर तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, दिनांक ०१ मे २०२१ ते ०५ मे २०२१ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते अंशतः ढगाळ तसेच दिनांक ०१ मे २०२१ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडात आणि हलका ते मध्यम पाऊस, दिनांक ०२, ०३, ०४ आणि ०५ मे २०२१ रोजी काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

Vegetable and other vine family crops should be supported with bamboos depending on the stage of crop growth. Animals should be kept away from open water sources, rivers or lakes and tractors and other metal implements. Avoid letting cow, buffalo, goats, sheep, and other animals graze in open spaces as there is a possibility of rain and lightning. Make arrangements to provide feed and water to the cattle at shed.

भाजीपाला आणि वेलवर्गीय पिकाला पिक वाढीची अवस्था बघून आधार द्यावा. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरांना गोठ्यातच चारा आणि पाण्याची व्यवस्था करावी.

### SMS Advisory:

Thunderstorms and lightning are likely to forecasted during next five days, if you hear thunderstorms while working in the fields take shelter in a safe place immediately.

पुढील पाच दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने शेतात काम करता असताना मेघगर्जनेचा आवाज आल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| RICE | Paddy Blast Disease Management: Spray Hexaconazole 5% EC @ 20 ml. or Isoprothiolane 40% E.C @ 15 ml or Tebuconazole 25.9% EC @ 15 ml per 10 liters of water. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | धान करपा रोग व्यवस्थापन: हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा आयसोप्रोथिलेन ४० % ई.सी. @ १५ मि.ली. किंवा टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| GROUNDNUT | In groundnut, for control of rust and tikka (leaf spot), spraying should be done of Tebuconazole 25 % WG 500-750 gm per hectare mix with 500 litre) of water. (10 to 15 gram/10 litre of water. |
| | भुईमुग पिकावरील तांबेरा आणि टिक्का या रोगाचे नियंत्रणाकरिता टेबूकोनाझोल २५ टक्के डब्ल्यू. जी. ५०० ते ७५० ग्राम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून (१० ते १५ ग्राम प्रती १० लिटर पाणी) फवारणी करावी. |
| GROUNDNUT | In groundnut, for control of leaf folder or leaf miner, when ETL cross (2 larva per plant or 10 percent leaves are damage), then apply spraying of Quinalphos 25 % EC, 1 litre/hectare mix with 500 litre of water (20 ml/10 litre of water) or Deltamethrin 2.8 % EC, 500 ml per hectare in 400-600 litre of water (10ml/ 10 litre of water). For control thrips, when ETL cross (5 thrips per three leaves), then spraying should be taken of Quinaphos 25 % EC (28 ml/10 liter of water) 1400 ml/hectare in 500 litres of water. |
| | भुईमुग पिकामध्ये पाने पोखरणारी अथवा गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दोन अळ्या प्रती झाड किंवा झाडाच्या मध्यवर्ती भागात १० टक्के पाने पोखरलेली अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळल्यास क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १ लिटर प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून (२० मी.ली./ १० लिटर पाणी) किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ५०० मी.ली. प्रती हेक्टरी ४००-६०० लिटर पाण्यात मिसळून (१० मी.ली./ १० लिटर पाणी) फवारणी करावी. फूलकिड्यांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी ५ फुलकिडे प्रति शेंडा गाठल्यावर क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १४०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर (२८ मी.ली./१० लिटर पाणी) पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| OKRA/ LADIES' FINGER | Okra crop may get infested by fruit borer pest. For its control spray Quinalphos 25 % EC 16 ml per 10 liters of water or NSKE 0.005 % for first spraying after the infestation was noticed and if need take second or third spraying after 15 days interval. |
| | भेंडी पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणाकरिता क्विनालफॉस २५ टक्के ईसी १६ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा ०.००५ टक्के निंबोळी या किटकनाशाकाची पहिली फवारणी प्रादुर्भाव दिसून येताच व त्यानंतर गरज भासल्यास दुसरी आणि तिसरी फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी. |

**Horticulture Specific Advisory:**

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| CABBAGE | For management of Diamond Back Moth on Cabbage & Cauliflower, Spraying should be done of Chlorpyrifos 20 EC 40 ml or Spinosad 2.5 SC 12 ml or Fenvalerate 20 EC 5 ml per 10 liters of water. |
| | कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| CHILLI | To control leaf curl disease in chilli crop, spraying should be taken of Fipronil 5 EC @ 15 ml or Spinosad 45 EC @ 4 ml in 10 liters of water. |
| | मिरची पिकावरील चुरडा मुरडा या रोगाच्या नियंत्रणाकरिता फिप्रोनील ५ ई.सी., १५ मिली किंवा स्पिनोसॅड ४५ ई.सी., ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ORANGE | Orange Fruit Dropping Management: Foliar application of gibberellic acid 1.5 gm + urea 1 kg may be given during fruit set after mixing it in 100 litres water. (Dissolve gibberellic acid in 10 ml alcohol before mixing in water). Spray 2, 4-D/ 1.5gm and potassium nitrate 1kg in 100 liters water if there is sudden rise in temperature between 35 to 40 degree Celsius. |
| | संत्रा फळ गळ व्यवस्थापन: फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). तापमानातील वाढ (३५ ते ४० अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Live Stock Specific Advisory:**

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| COW | Deworming of livestock should be done by seeking advice of Veterinary practitioner. One week after Deworming, vaccinate the cattle and buffaloes against Foot, & mouth disease (FMD), Black quarter (BQ) and Haemorrhagic Septicaemia (HS). Keep the livestock under the shed to protect from heat and lightning. Offer clean and cold water (stored in earthen pot) to the animals. Those who have cultivated berseem, should be done top dressing of 10 kg N/ha after each cutting to encourage quick growth and high yield. |
| | पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. जंतनाशाकाची मात्रा/लस दिल्यावर एक आठवड्यानंतर गायी आणि म्हशींना तोंडखुरी/पायखुरी, एकटांग्या, घटसर्प टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांचे उष्णतेपासून व विजांचा कडकडाट होण्यापासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Groundnut, sesame, green gram, and sugarcane should be irrigated at intervals of 6 to 7 days depending on the available soil moisture and crop need. Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. भुईमुग, तीळ, मुग आणि उस पिकास जमिनीतील उपलब्ध ओलावा बघून पिकाच्या गरजेनुसार ६ ते ७ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. |
| SOIL TESTING | Soil samples for soil testing should be taken and sent to the nearest Agriculture university, Krishi Vigyan Kendra or other government soil testing laboratory with appropriate soil testing charges. |
| | माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते जवळच्या विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र किंवा इतर शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षणाच्या अहवालानुसार पिकानुसार रासायनिक खताचे किंवा इतर कृषी निविष्ठांचे नियोजन करावे. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: If you are working in the field, take shelter immediately near the field. After taking shelter in a safe place in the field, keep dry wood, plastic, gonapath, dry mulch under the feet. Sit with both feet together and both hands on your knees. Make sure that no part of your body touches the ground except your feet. Individuals working in ponds, such as places where there is moisture in the soil or water sources, should go to a safe and dry place immediately. If there are tall trees nearby, take shelter at a distance twice the height of that tree. |
| | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्ही शेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडा पालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून तळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणी किंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे. जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावर आश्रय घ्यावा. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: A pucca house is the safest place to avoid lightning. Farmers should plant trees as low as possible around their houses and livestock sheds. Moist, swampy places and water sources (wells, lakes, rivers, farm ponds etc.) should be avoided as much as possible. If traveling in a four-wheeler, stop in the vehicle. Farmers should take care that they do not have any metal tools. When working in the field, do not let more people work together at the same time. Care should be taken to keep a distance of at least 15-20 feet between two persons. Do not use an umbrella with a metal rod. Stay away from other electric tools made by farmers as |

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्या बचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेच जनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासून शक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे. शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी. शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोन व्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडी असलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासून बनलेल्या इतर कृषी अवजार |
| GENERAL ADVICE | After harvesting of crop, advise for deep ploughing of harvested fields to expose the hibernating insects, larvae/pupa to sun and predator birds. To solve the problems related to agriculture call Toll Free no 1800 180 1551. To solve the problems related to National Agriculture Market (e-NAM) call Toll Free Number 1800-270-0224. To solve the problems related to transport of agricultural inputs between inter states, call Toll Free no 1800 180 4200, from any mobile or landline. |
| | पिकाची काढणी झाल्यानंतर जमिनीतील ओलाव्याचा फायदा घेत शेतजमिनीची त्वरित खोल नांगरणी करावी, त्यामुळे जमीन तापण्यास मदत होवून किडींचे कोष व घातक बुरशीचा नायनाट होईल. शेतीशी संबधित समस्यांच्या निराकरणासाठी १८०० १८० १५५१, राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) च्या उपयोगासाठी येणाऱ्या कोणत्याही समस्यांच्या निराकरणासाठी १८०० २७० ०२२४, शेतीशी निगडीत आदानांच्या आंतरराज्यीय वाहतुकीसंबंधित येणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी १८०० १८० ४२०० आणि १४४८८ या दूरध्वनी क्रमांकावर भ्रमणध्वनी अथवा लँडलाईन क्रमांकावर संपर्क करावा. |